सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई


८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र. रासाप्रपक/कृशिप्र-१३२६/प्र.क्र. प्रप्र/DSE/सूचना क्र.१/१२९८/२०२६/ दिनांक : ०३/०६/२०२६

## जाहिर सूचना क्रमांक - १

### राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षातील प्रवेश कार्यक्रम २०२६-२७

महाराष्ट्र राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली या चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षामधील कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या [B.Sc. (Agri)] थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश देण्याची प्रक्रिया दिनांक ०३ जुन, २०२६ पासून सुरु होत आहे. यासाठी प्रवेश पात्रता व इतर तपशील खालीलप्रमाणे आहे.

| व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रम | कालावधी | श्रेयांक भार | प्रवेशासाठी पात्रतेच्या अटी व शर्ती |
|---|---|---|---|
| बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी) चे थेट द्वितीय वर्ष | ३ वर्षे (६ सत्रे) | १३८ | महाराष्ट्र राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत कृषी तंत्रनिकेतन मधून ३ वर्षाचा, इंग्रजी माध्यमातील कृषी तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण.<br>३ वर्षाच्या इंग्रजी माध्यमातील कृषी तंत्रनिकेतन पदविकेमध्ये, खुल्या प्रवर्गासाठी किमान ६० एकत्रित श्रेयांक सरासरी गुण (सी.जी.पी.ए.) सह उत्तीर्ण व आरक्षित प्रवर्गासाठी (अ.जा. / अ.ज. / वि.जा. / भ.ज. (ब) / भ.ज. (क) / भ.ज. (ड) / इमाव / विमाप्र / सा. व शै. मा. व. / आ.दु.घ. / दिव्यांग / अनाथ) किमान ५० एकत्रित श्रेयांक सरासरी गुण (सी.जी.पी.ए.) सह उत्तीर्ण. |

वरील ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून राबविण्यात येत आहे. यासाठी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली प्रवेश माहिती पुस्तिका व प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या https://cetcell.mahacet.org संकेतस्थळावर दिनांक ०३ जुन, २०२६ रोजी पासून उपलब्ध होईल. ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिनांक १२ जुन, २०२६ असा आहे.

**सही/-**
**(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**